वर्ष : ०६ | अंक: ०९ | मुंबई, मंगळवार २१ जानेवारी २०२० ते सोमवार २७ जानेवारी २०२० | पृष्ठ: ४

# पोलीस बातमी पत्र

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

WeWite: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक | सह संपादक:- सौ अश्विनी नाईक-परब

PG 2 पश्चिम रेल्वेच्या अपघातांत वर्षभरात २१४ बळी

3 → नागरिकत्व सुधारणा कायदा नव्या वळण

'ॲमेझॉन' १० लाख भारतीयांना देणार नोकऱ्या ← 4

## 'साईबाबांचा जन्म शिर्डीचा की पाथरीचा' वादावर अखेर पडदा

### 'पाथरी हे साईचं जन्मस्थळ' हे वक्तव्य मुख्यमंत्र्यांकडून मागे

## मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनानंतर शिर्डीकरांचे आंदोलन मागे





**शिर्डी ग्रामस्थांचं शिष्टमंडळ आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यात झालेल्या बैठकीत अखेर वादावर पडदा पडला आहे. या बैठकीत मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी पाथरी हे साईबाबांचं जन्मस्थळ असल्याचं वक्तव्य मागे घेतलं. तसंच पाथरीचा विकास तीर्थक्षेत्र म्हणून करणार असं आश्वासन दिल्यानंतर शिर्डीकरांनी आंदोलन मागे घेतलं आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वी साईबाबांचा जन्म पाथरी या ठिकाणी झाला हे वक्तव्य केलं होतं. त्यावरुन बराच वाद निर्माण झाला होता. सोमवारी अखेर त्या वादावर पडदा पडला आहे.**

### काय आहे प्रकरण?

पाथरी हे साईबाबांचे जन्मस्थळ आहे. त्या अनुषंगाने पाथरीचा विकास करण्यात येईल. पाथरी गावासाठी १०० कोटींचा विकास आराखडा तयार असल्याचं वक्तव्यही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केलं होतं. ज्यानंतर वाद निर्माण झाला होता. शिर्डीमध्ये या वक्तव्याविरोधात पडसाद उमटले. रविवारी शिर्डी बंदचीही हाक देण्यात आली. त्यानंतर सोमवारी शिर्डीच्या ग्रामस्थांचं शिष्टमंडळ, पाथरीमधील गावकऱ्यांचं शिष्टमंडळ आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यात एक बैठक पार पडली. या बैठकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचीही उपस्थिती होती.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पाथरीचा उल्लेख साईबाबांचे जन्मस्थळ असा करून पाथरीसाठी विकास योजना जाहीर केली होती. त्यामुळे वादाला तोंड फुटले होते. पाथरी नव्हे तर शिर्डी हेच साईबाबांचे जन्मस्थळ असल्याचे सांगत शिर्डीकरांनी बेमुदत शिर्डी बंद पुकारला होता. याप्रश्नी चर्चेअंती तोडगा काढण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले होते. त्याचवेळी बंद मागे घेण्याची विनंतीही मुख्यमंत्र्यांनी केली होती. या विनंतीला मान देत शिर्डीकरांनी रविवारी रात्री बंद मागे घेतला होता. दरम्यान, या प्रश्नावर आज मुख्यमंत्र्यांनी मंत्रालयात तातडीने बैठक घेतली व वादावर यशस्वी तोडगा काढला.

शिर्डी व पाथरीकरांनी आजच्या बैठकीत सामोपचाराची भूमिका घेतली. साईबाबांचे जन्मस्थळ म्हणून नाही तर तीर्थक्षेत्र म्हणून पाथरीचा विकास होणार असेल तर त्यास आमची कोणतीही हरकत नाही, अशी भूमिका शिर्डीतील ग्रामस्थ प्रतिनिधींनी बैठकीत मांडली. ही भूमिका दोन्ही बाजूने मान्य झाली. मुख्यमंत्र्यांनीही पाथरीचा साईबाबांचे जन्मस्थळ हा उल्लेख मागे घेतला. 'पाथरी तीर्थक्षेत्र विकास' हे नाव योजनेसाठी निश्चित झाले आणि वाद संपुष्टात आला. ग्रामस्थांचे प्रतिनिधी म्हणून बैठकीसाठी उपस्थित राहिलेले खासदार सदाशिव लोखंडे यांनी बैठकीबाबत समाधान व्यक्त केले. शिर्डीकरांच्या बाजूने हा वाद आता संपला आहे, असे त्यांनी सांगितले.




## मनसेच्या चिन्हात आता फक्त इंजिन!

### कोणता झेंडा घेणार राज हाती?



मनसे अध्यक्ष राज ठाकरे २३ जानेवारी रोजी काय भूमिका घेणार हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही. मात्र ते त्यांच्या पक्षाचा झेंडा बदलणार हे नक्की झालंय कारण त्यांच्या पक्ष चिन्हातून झेंडा काढण्यात आला आहे आणि फक्त रेल्वे इंजिनच ठेवण्यात आलं आहे. MNS Adhikrut या ट्विटर हँडलवरुन पक्षचिन्हाच्या मागे असलेला झेंडा हटवण्यात आला आहे. त्या ठिकाणी आता फक्त रेल्वे इंजिनच दिसतं आहे. त्यामुळे निळा, भगवा आणि हिरवा असे तीन रंग असलेला मनसेचा झेंडा बदलणार हे निश्चित मानलं जातं आहे. मात्र त्याचसोबत राज ठाकरे कोणता झेंडा हाती घेणार? हा प्रश्नही उपस्थित होतो आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात गेल्या काही दिवसांमध्ये दोनदा दोन बैठका पार पडल्या. या बैठकांमध्ये काय बोलणं झालं ही माहिती समोर येऊ शकलेली नाही. मात्र भाजपा आणि मनसे यांची युती होऊ शकते अशा चर्चांना राजकीय वर्तुळात उधाण आलं. मनसेने कार्यपद्धतीत काही बदल केले तर युती शक्य आहे असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं होतं. मात्र राज ठाकरे यांच्याकडून यासंदर्भात काहीही वक्तव्य समोर आलेलं नाही. मनसेचे नेते बाळा नांदगावकर यांनी राजकारणात कुणीही कुणाचा फार काळासाठी शत्रू नसतो असं सूचक वक्तव्य केलं होतं. आता मनसेने ट्विटर अकाऊंटवरुन झेंडाही हटवला आहे. त्यामुळे भगवा झेंडा हाती घेऊन राज ठाकरे हिंदुत्वाच्या वाटेवर जाणार का? हा प्रश्न उपस्थित होतो आहे.

## ज्येष्ठ नागरिकांना सन्मानाची वागणूक द्या - नंदू जाधव



दिनांक १५.१.२०२० रोजी भाईंदर उत्तन येथे वानप्रस्थाश्रमामध्ये घेण्यात आलेल्या कार्यक्रमात सोशल राईट्स फाऊंडेशनचे क्रिडा समिती अध्यक्ष नंदू जाधव यांनी वरील उद्गार काढले. क्रिकेटमध्ये प्राविण्य मिळवलेल्या आपला मुलाचा सिध्देश चा वाढदिवस हॉटेल मध्ये साजरा न करता जेष्ठ नागरिकअसलेल्या आश्रमात साजरा केला. यावेळी दिडशे जेष्ठ नागरीकांना जेवण नंदू जाधव यांच्यावतीने देण्यांत आले . या कार्यक्रमात जेष्ठ नागरिकांनी नाच,गाणे असे कार्यक्रम स्वतःहा साजरे केले. वानप्रस्थाश्रम आश्रमातील प्रशासनाने या कामी खूप चांगले सहकार्य केले. प्रत्येकाने आपले जन्मदिवस अश्या आश्रमात साजरे करावे यामूळे जेष्ठ नागरिकांमधील दुरावा दुर होऊन एकनवीन नाते तयार होते व त्यांचाही विरंगूळा होतो असे नंदू जाधव यांनी सांगितले व हा कार्यक्रम मोठया आनंदाने साजरा केला.

## अंधेरी साईवाडी येथे सिनीअर सिटीझन सोशल राईट्सच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले






सतत होणारे जेष्ठ नागरिकांचे तसेच लहान मुलांचे अपघात मोठया प्रमाणात साई वाडी च्या अंधेरी हाइवे व स्टेशनला जोडणाऱ्या पुलाजवळ सतत होत असतात. वारंवार महानगरपालिकेला कळवून देखील महानगरपालिका दुर्लक्ष करीत आहे व अधिकारीवर्ग उडवाउडवीची उत्तरे देतात. यासाठी तिथे सिनीअर सिटीझन सोशल राईट्स फाऊंडेशनच्या अंधेरी कमिटीच्या अध्यक्ष तुकाबाई चौधर यांच्यावतीने सर्व जेष्ठ नागरिकांना रस्त्यावर उतरवण्यात आले. रिक्षावाल्यांची मुजोरी , वेगाने वाहणारी वाहने , चौकात विजेचे खांब पुर्ववत नसणे , अशा अनेक प्रकारच्या मागण्या या जेष्ठ नागरिकांच्या होत्या. साईवाडी ते रेल्वे स्टेशन असा प्रवास करणाऱ्या जेष्ठ नागरिकांना रिक्षावाले नकार देतात. यासाठी सदर संस्थेने वारंवार पोलिसांशी संपर्क करुन मागणी केली होती. जवळजवळ या परिसरात ३ ते ४ लाख लोकांची वस्ती आहे. येथे आपल्या जागा गमावून असुरक्षित अशी घरे या परिसरातील एस.आर.ए. च्या माध्यमातून बनवून दिली आहेत. व त्याच जागेवर आपली मोठमोठी व्यापारी संकुले इथल्या स्थानिक बिल्डरांनी बनवली आहेत. या वस्तीमधील सर्व रहिवाशांना एका

उर्वरित पृष्ठ 2 वर



# मुंबईत २६ जानेवारीपासून 'रात्रीचा दिवस'

**मुंबई-** जे शहर कधीच झोपी जात नाही, ते आता रात्रीही जागे राहणार आहे. मुंबईतील काही उपाहारगृहे, हॉटेल्स आणि मॉल्स २६ जानेवारीपासून २४ तास सुरू ठेवण्याचा निर्णय राज्य मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त प्रवीण परदेशी यांनी पालिकेने केलेल्या तयारीची माहिती दिली. रात्रजीवनाच्या संकल्पनेशी कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निगडीत असल्याने मुंबईचे पोलीस आयुक्त



सरकारने घेतला आहे. मुंबईत 'रात्रजीवन' सुरू करण्याचे युवा सेनेचे प्रमुख आणि पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे यांचे स्वप्न होते. ते २६ जानेवारीपासून साकार होत आहे. रात्रजीवनाच्या पहिल्या टप्प्यात निवासी भागात नसलेल्या हॉटेल्स-मॉल्स- मल्टिप्लेक्सचा समावेश करण्यात येणार असून काही कालावधीनंतर आढावा घेऊन आणखी काही ठिकाणांचा समावेश त्यात करण्यात येईल. पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मुंबईत 'रात्रजीवन' सुरू करण्याबाबत संजय बर्वेही या बैठकीला उपस्थित होते. मुंबईत २६ जानेवारीपासून 'रात्रजीवन' सुरू करण्यास या बैठकीत हिरवा कंदील दाखवण्यात आल्याचे समजते. मुंबईतील सुमारे २५ मॉल्स आणि उपाहारगृहांनी २४ तास सेवा देण्याची तयारी दर्शवली आहे. त्यानंतर निवासी भागातील आस्थापना आणि उपाहारगृहांना २४ तास सेवा देण्याची परवानगी देण्यात येईल. परंतु त्यासाठी अग्निसुरक्षा आणि सुरक्षाव्यवस्थेची अटक असेल, असे बैठकीला उपस्थित असलेल्या एका अधिकाऱ्याने सांगितले.

# मुंबई महानगरपालिकेचा फक्त ४५ टक्के निधीचा वापर

**मुंबई-** श्रीमंत महानगरपालिका अशी ख्याती असलेल्या मुंबई महापालिके ने २०१९-२०च्या आर्थिक तरतुदींपैकी केवळ ४५ टक्केनिधीच वापरल्याचे स्पष्ट झाले आहे. याचा अर्थ ५५ टक्के निधी वापराविना पडून आहे. गेल्या काही वर्षांच्या तुलनेत यंदा तरतूद केलेल्या निधीपैकी जास्तीतजास्त निधी खर्च करण्यात पालिकेला यश आले असले, तरी डिसेंबपर्यंत ५० टक्के निधीही खर्च करता आलेला नाही. सागरी किनारा रस्ता, गोरेगाव-मुलुंड जोड रस्ता यांसारखे प्रकल्प रखडल्यामुळे हा निधी वापरला गेला नाहीच, पण आरोग्य विभागाचाही केवळ ३० टक्के निधी वापरला गेला आहे. केवळ रस्ते, पूल आणि पर्जन्य जलवाहिन्या या विभागांचाच निधी ७० टक्क्यांपेक्षा जास्त वापरला गेला आहे.



फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात २०२०-२१ या आर्थिक वर्षांचा अर्थसंकल्प सादर होणार असून पालिका प्रशासन नवीन अंदाजपत्रक तयार करीत आहे. मात्र डिसेंबपर्यंत केवळ ४५ टक्केनिधीच वापरला गेला असल्याचे वित्त विभागाच्या आकडेवारीवरून स्पष्ट होते. दरवर्षी वाढत चाललेल्या अर्थसंकल्पातील फुगवटा कमी करण्यासाठी पालिका प्रशासनाने २०१७-१८ अर्थसंकल्पाचे आकारमान १२ हजार कोटींनी कमी केले होते. भारंभार आर्थिक तरतुदी केल्यानंतर त्याचा पुरेपूर वापर केला जात नाही आणि अर्थसंकल्पाचे आकारमान वाढत जाते. त्यामुळे तत्कालीन आयुक्त अजोय मेहता यांनी एका वर्षांत प्रकल्पाला जेवढा निधी लागेल तेवढ्याचीच तरतूद करण्याचा पायंडा पाडला. तीच पद्धत तीन वर्षांपासून सुरू आहे. मात्र यंदाही विकासकामांचा ४४.४६ टक्केनिधी वापरला गेला. पालिकेने २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी ३०,६९२.५९ कोटींचा अर्थसंकल्प सादर केला होता. यामध्ये रस्ते, पूल, आरोग्य, पाणी, विकास नियोजन, घनकचरा, पर्जन्य जलवाहिन्या अशा विभागांतील भांडवली खर्चासाठी ११,४८०.४२ कोटींची तरतूद करण्यात आली होती. ३१ डिसेंबर २०१९ पर्यंत या अंदाजपत्रकातील भांडवली तरतुदींपैकी केवळ ४४.४६ टक्के निधी वापरला गेला. म्हणजेच भांडवली तरतुदींपैकी ५८६५.६८ कोटींचा निधी खर्च झाला आहे.

# पश्चिम रेल्वेच्या अपघातांत वर्षभरात २१४ बळी



**विरार : सर्वसामान्य माणसांच्या दैनंदिन आयुष्याची जीवनवाहिनी समजली जाणारा लोकल रेल्वे प्रवास दिवसेंदिवस जीवघेणा ठरू लागला आहे. मीरा रोड ते वैतरणा स्थानकांदरम्यान २०१९ या वर्षात विविध अपघातांत तब्बल २१३ प्रवाशांना जीव गमवावा लागला आहे. त्यात रूळ ओलांडताना ११० प्रवाशांना तर लोकल ट्रेनमधून पडून ४७ प्रवाशांना जीव गमवावा लागला.**

वसई रेल्वे पोलिसांच्या हद्दीत मीरा रोड ते वैतरणा या रेल्वे स्थानकांचा समावेश होतो. या स्थानकात २०१९ या वर्षांत २१३ प्रवाशांचा रेल्वे अपघातात मृत्यू झाला. यामध्ये रूळ ओलांडताना तसेच ओव्हरहेड वायरचा धक्का लागल्याने ११० प्रवाशांचा मृत्यू झाला. धावती ट्रेन पकडण्याच्या नादात ५७ प्रवाशांचा तर धावत्या ट्रेनमधून पडून ४७ प्रवाशांचा मृत्यू झाला.

याच भागात २०१८ या वर्षांत २४६ प्रवाशांचा रेल्वे अपघातात मृत्यू झाला होता. रेल्वे अपघाताचे प्रमाण कमी व्हावे, यासाठी रेल्वे प्रशासनातर्फे विविध उपायोजना करण्यात आल्या होत्या. त्यामुळे २०१९ या वर्षांत मृत्यूंच्या संख्येत ३३ ने घट झाल्याचे रेल्वे पोलिसांनी सांगितले. मागील वर्षी रेल्वे रुळ ओलांडताना १५१ प्रवाशांचा मृत्यू झाला होता. रूळ ओलांडू नये यासाठी रेल्वे प्रशासनाकडून सातत्याने जनजागृती आणि दंडात्मक कारवाई केली जाते.

## विरार लोकलचा प्रवास धोकादायकच

पश्चिम रेल्वेची विरार, वसई, नालासोपारा, भाईंदर, मीरा रोड ही गर्दीची स्थानके आहेत. या स्थानकातून सकाळी व संध्याकाळच्या गर्दीच्या वेळी चढणे व उतरणे कठीणच जाते. कारण ट्रेनमधले काही प्रवासी दरवाजे अडवून ठेवतात. त्यामुळे अनेक प्रवासी दरवाजावर लटकून प्रवास करतात. गाडी सुरू झाल्यावर हात सटकून अथवा खांबाला धडकून अपघात होतात.

# विद्यार्थी-पालकांची पहिली पसंती मुंबई विद्यापीठालाच

**मुंबई-** कोकण विभागासाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याऐवजी मुंबई विद्यापीठाचा ब्रँडच अधिक विकसित आणि सशक्त करावा आणि मुंबई विद्यापीठावरील प्रशासकीय ताण आणि विद्यार्थ्यांना होणारा त्रास कमी होण्यासाठी रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर, ठाणे, कल्याण या ठिकाणी जिथे कमी वेळेत उपकेंद्र सुरू होऊ शकते, त्याचा प्रस्ताव तातडीने पाठवावा, अशा सूचना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी येथे दिल्या. याआधी स्वतंत्र कोकण विद्यापीठासाठी सचिव पातळीवर समिती स्थापन करण्याच्या सूचना दिल्यानंतर विद्यार्थी-प्राचार्यांमधील या संदर्भातील मतमतांतरे त्यांनी जाणून घेतली.

# तीन वर्षांत स्वाइन फ्लूच्या रुग्णांत घट

**मुंबई-** वातावरणात सातत्याने बदल होत असले तरी वेळेत निदान, उपचार, प्रतिबंधात्मक लस या उपायांमुळे गेल्या काही वर्षांत राज्यातील स्वाइन फ्लू नियत्रंणात आणण्यात आरोग्य विभागाला काही अंशी यश आले आहे. गेल्या तीन वर्षांत राज्यभरात स्वाइन फ्लूने मृत्यू झालेल्यांच्या संख्येत तिपटीहून अधिक घट झाली आहे. हेच चित्र फ्लूबाधित रुग्णांच्या आकडेवारीतूनही स्पष्ट होते.

२०१५ मध्ये राज्यात स्वाइन फ्लूने थैमान घातले होते. राज्यभरात स्वाइन फ्लू रुग्णांची संख्या आठ हजारांवर पोहोचली होती, ९००हून अधिक जणांचा मृत्यू झाला होता. फ्लूबाबत केलेली जनजागृती आणि निदान ते उपचारासाठी केलेल्या विविध प्रयत्नांमुळे रुग्ण आणि मृतांच्या संख्येत गेल्या पाच वर्षांत घट झालेली दिसते. स्वाइन फ्लूचे विषाणू पावसाळ्यात आणि हिवाळ्याच्या सुरुवातीस अधिक प्रभावी असतात. वातावरणातील बदल हा स्वाइन फ्लूच्या प्रसाराचे



महत्त्वाचे कारण आहे. तसेच या विषाणूच्या जनुकीय रचनेमध्ये होणाऱ्या बदलावरही फ्लूचा धोका अवलंबून आहे. गेल्या काही वर्षांमध्ये प्रतिबंधात्मक उपाय म्हणून उच्च रक्तदाब, मधुमेहाचे रुग्ण, गरोदर स्त्रिया, ज्येष्ठ नागरिक, रुग्णांच्या थेट संपर्कात येणारे आरोग्य क्षेत्रातील कर्मचारी या जोखमीच्या गटामध्ये केलेल्या लसीकरणामुळे मृतांची संख्या घटल्याचे साथरोग नियंत्रण विभागाचे प्रमुख डॉ. प्रदीप आवटे यांनी सांगितले. लसीकरणाबाबत डॉ. आवटे म्हणाले, "२०१८ मध्ये १ लाख २८ हजार जोखमीच्या गटातील व्यक्तींचे लसीकरण केले. या वेळी डिसेंबपर्यंत ६२ हजार जणांनीच लसीकरण केले आहे. गेल्या वर्षी स्वाइन फ्लूची लागण कमी झाल्याने लोकांमध्ये भीतीचे वातावरणही तुलनेने कमी होते. त्यामुळे लसीकरणाकडे दुर्लक्ष करण्यात आले. लसीकरणाचा प्रभाव साधारणपणे ९ ते २० महिने टिकतो. म्हणून या वर्षांचा लसीकरणाचा कार्यक्रम आता सुरू केला असून एक लाखाहून अधिक लस विभागाने घेतल्या आहेत.

# मुंबईतील धारावी पोलीस ठाण्यातील वपोनी मदतनीस पो.कर्मचारी राणे, शिंदे, तळेकर सापडले लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कारवाईत

**राणे,शिंदे,तळेकर यांच्या कामाची/ भ्रष्टाचाराची परिपूर्ती करून कोण भरणार ही पोकळी मोठा यक्ष प्रश्न मा.वपोनी धारावी पोलीस ठाणे त्यांचे चार पोलीस निरीक्षक, बिट मार्शल आणि वायलेस मोबाईल यांचे अन्न दाते भ्रष्टाचार प्रकरणांत अडकल्याने सर्व पोलीस ठाणे पोरके झाले.**

कारण पोलीस कर्मचारी राणे शिंदे,तळेकर,यांनी तक्रारदार यांच्याकडे एकूण ३२ हजार रुपयांची मागणी केली ती अगदी मा.वपोनी,४ पोलीस निरीक्षक, वायरलेस गाड्या बिट मार्शल यांना वाटण्यासाठी व ते दरमहा द्यावे लागतील धंदा करावयाचा असल्यास असे मनमानी कारभार व भ्रष्टाचार या सर्व पोलीस ठाण्यात राजरोसपणे मा वरिष्ठ यांच्या नावाचा वापर करून खुलेआम केला जात आहे या भ्रष्टाचार प्रकरणांत सर्वात जास्त त्रास हा संबंधित विभागातील अनधिकृत फेरीवाले यांनाच दिला जातो हे सत्य त्या त्या विभागातील सर्व कनिष्ठ कर्मचारी पदापासून अगदी अति वरिष्ठ पोलीस अधिकारी यांना या भ्रष्टाचार प्रकरणातील कार्यप्रणाली माहीत आहे पण केवळ भ्रष्टाचार करण्यासाठी काही ठराविक कर्मचारी यांची अगदी भरती झाल्या पासून सेवानिवृत्ती पर्यत हीच कामे ही ठराविक मंडळी वरिष्ठ यांच्या संगनमताने प्रत्येक ठिकाणी करत असतात.



या कार्यपद्धती तुन वाहतूक विभाग ही सुटला नाही आता या यांच्या भ्रष्टाचार प्रकरणां मुळे सर्व पोलीस दलाच्या अब्रूची लक्तरे वेशीला टांगली जात आहेत पोलीस दलाची बदनामी,प्रतिमा मलिन होत आहे याची जाणीव मा.वरिष्ठ पोलीस अधिकारी यांना का नाही हे ही एक गूढच आहे मुंबईतील सर्व पोलीस ठाण्यातील मा.अपर पोलीस आयुक्त सो मा.पोलीस उप आयुक्त सो, मा.सहाय्याक पोलीस आयुक्त सो आणि पोलीस ठाण्यातील मा वपोनी आणि मा पोलीस निरीक्षक यांनी असल्या मनमानी कारभार भ्रष्टाचार करण्यात गुंतलेल्या सर्व पदावरील पोलीस अधिकारी कर्मचारी यांच्यावर योग्य अंकुश आणून कठोरपणे अशा भ्रष्टाचार करणारांवर कारवाई करण्याचे आदेश जारी केले तरच पोलीस दलातील भ्रष्टाचार हा असाध्य रोग आटोक्यात येईल परंतु इथे काही ठराविक वरिष्ठ यात स्वतःहून हिरीरीने सहभागी झाले आहेत त्यामुळे कुपंच शेत खात आहे शेताने तक्रार कोणाकडे करावी सदर कारवाईत पोलीस कर्मचारी राणे,शिंदे,तळेकर यांनी फिर्यादीला कोणा कोणाला किती पैसे दयावे लागतील ते फिर्यादीने त्यांच्या जबाबात सांगितले म्हणून हे सर्व लिहिण्याची वेळ आली.


# रिक्षा-टॅक्सी चालकांना 'मराठी'चे धडे

**मुंबई** - 'भैया लेफ्ट लेके मोठेवाले झाड के पास गाडी खडा करो', 'शंभर रुपया छुट्टा मिलेगा ना', असे संवाद रिक्षा-टॅक्सीतल्या प्रवासात सहज ऐकायला मिळतात. कारण अमराठी चालकांना स्थानिक भाषा येत नसते. अशावेळी एखाद्या प्रवाशाचा 'मराठी बाणा' जागा झाल्यास तो अस्खलित मराठीत चालकाला सूचना देऊ लागतो. प्रवासी आणि रिक्षा-टॅक्सी चालक यांच्यातील हा विसंवाद सुसंवादात बदलावा यासाठी मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागाने रिक्षा-टॅक्सीचालकांना मराठीचे धडे देण्याची तयारी केली आहे.

जर्मन विभागाच्या वतीने सुरू असलेला मुख्य 'माय मराठी' प्रकल्प सहा पातळ्यांचा आहे. त्यासोबतच 'राज्य मराठी विकास संस्थे'च्या सहकार्याने अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषेचा विशेष लघू अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. यात युरोपीय भाषा अध्यापन पद्धतीचा वापर केला असल्याने कमी दिवसांत चांगल्याप्रकारे संवाद साधण्यास चालक शिकू शिकतील. यात चालकांना दिशांची मराठीतून ओळख करून दिली जाते. रस्ता विचारणे किंवा सांगणे याचबरोबर शहरातील रुग्णालये, शाळा, सिनेमागृहे, रेल्वेस्थानके, इत्यादी महत्त्वाच्या ठिकाणांची माहिती दिली जाते. भाड्याची रक्कम प्रवाशाला सांगता यावी यासाठी मराठी अंक ओळख अभ्यासात समाविष्ट करण्यात आली आहे. शासकीय कागदपत्रे वाचणे, अर्ज भरणे, स्वाक्षरी, निरीक्षक, वारसदार, साक्षीदार, वैधता, तपासणी, इत्यादी व्यवहार मराठीतून कसे करावेत यांविषयी चालकांना मार्गदर्शन केले जाणार आहे.

# मुंबई-पुणे प्रवासाचा वेळ कमी होणार; एक्स्प्रेस वेच्या रुंदीकरणाच्या कामाला वेग

**मुंबई-** आडोशी बोगदा ते खंडाळा एक्झिट या दरम्यानच्या मार्गावर कोसळणाऱ्या दरडी, चढ-उताराच्या प्रमाणामुळे पावसाळ्यात एक बाजू बंद ठेवावी लागते. यावर तोडगा काढण्यासाठी मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर रुंदीकरणाच्या कामाने वेग घेतला आहे. खोपोली एक्झिट ते सिंहगड संस्था या पट्ट्यात दोन्ही बाजूंनी सुमारे ६६४ मीटरपर्यंत बोगदा खोदण्यात आला आहे. उर्वरित कामही लवकरच पूर्ण होणार आहे. यामध्ये खालापूर ते खोपोली असा मार्ग आठ पदरी करण्याचे काम सध्या सुरू आहे. खोपोली एक्झिट ते सिंहगड संस्था या १३.३ कि.



मी. दरम्यान दोन बोगदे आणि दोन पूल बांधण्यात येत आहेत. यामुळे खोपोली ते सिंहगड असे १९ कि. मी. अंतर १३.३ कि.मी.वर येणार आहे. यामुळे मुंबई-पुणे असा प्रवास २५ मिनिटांनी कमी होईल. आडोशी बोगदा ते खंडाळा हा सहा पदरी मार्ग असला, तरी दहा पदरी मार्गाइतकी वाहतूक असते. या मार्गावर दरडीही कोसळून वाहतूककोंडी होते.

राष्ट्रीय महामार्ग ४ हा पुण्याच्या पुढे बंगळुरूपर्यंत सहा पदरी करण्यात येत आहे. जेएनपीटी ते राज्य महामार्ग क्र. ४ रस्त्याचे सहा पदरीकरण झाल्यानंतर वाहतुकीत वाढ होणार आहे. नवी मुंबई विमानतळामुळे पुणे ते नवी मुंबई वर्दळ वाढणार आहे. शिवडी-न्हावा शेवा ट्रान्स हार्बर प्रकल्प आणि चाकण विमानतळामुळे वाहतूक वाढणार आहे. दिघी बंदर प्रकल्प मुंबई- पुणे कॉरिडोरपासून ५० किमी अंतरावर असल्याने, एक्स्प्रेस वेवरील वाहतूक वाढणार आहे. भविष्यात वाढणाऱ्या वाहतुकीचा अंदाज घेता, रुंदीकरणाचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

# पालिका शाळा अजूनही निवडणूक आयोगाच्या ताब्यात

**मुंबई-** निवडणुकांच्या निमित्ताने घेतलेल्या पालिका शाळांमधील वर्गखोल्या, सभागृह, प्रयोगशाळा आदी आजही निवडणूक आयोगाच्याच ताब्यात आहेत. काही ठिकाणी निवडणूक साहित्याने जागा व्यापली आहे, तर काही जागांचा वापर निवडणूक कार्यालयासाठी होत आहे. यामुळे संबंधित पालिका शाळांतील विद्यार्थ्यांच्या रहदारीचा प्रश्न उभा राहिला आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांची सुरक्षितता धोक्यात आली आहे. इतकेच नव्हे तर सभागृहाअभावी कार्यक्रमांना, तर प्रयोगशाळेअभावी विज्ञान प्रयोगांना विद्यार्थ्यांना मुकावे लागत आहे.

लोकसभा, विधानसभा अथवा पालिका निवडणुकांच्या कामांसाठी पालिकेबरोबर खासगी शाळा, महाविद्यालयांच्या जागांचा वापर करण्यात येतो. काही जागांचा वापर मतदान केंद्रासाठी केला जातो, तर काही ठिकाणी निवडणुकीशी संबंधित





कामांसाठी कार्यालय सुरू केले जाते. राष्ट्रीय कर्तव्य असल्यामुळे मागणीनुसार शाळांमधील वर्गखोल्या, सभागृह आदी जागा उपलब्ध करण्यात येतात. निवडणुका जवळ आल्यानंतर आयोगाकडून पालिकेकडे शाळांमधील जागांची मागणी केली जाते आणि पालिकेकडून त्या निवडणूक आयोगाला उपलब्ध केल्या जातात. काही वर्षांपूर्वी पालिकेच्या १० ते १२ शाळांमधील तब्बल १५ सभागृह आणि ३५ वर्गखोल्या निवडणूक आयोगाला कामानिमित्त देण्यात आल्या होत्या. यापैकी काही २००८ मध्ये तर काही २०१९ मध्ये देण्यात आल्या, पण आजतागायत या जागा पालिकेला ताब्यात मिळालेल्या नाहीत. निवडणूक आयोगाच्या ताब्यात असलेल्या वर्गखोल्यांमध्ये निवडणूकविषयक साहित्य ठेवण्यात आले आहे. या वर्गखोल्या ताब्यात मिळत नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या बसण्याची व्यवस्था करताना शाळा प्रशासन मेटाकुटीस येत आहे.

# मेट्रो-१वर प्लास्टीकऐवजी पेपर क्यूआर तिकीट; वेळेची होणार बचत

**मुंबई-** घाटकोपर ते वर्सोवा या मेट्रो-१ मार्गिकेवर प्लास्टीकच्या टोकनऐवजी पेपर क्यूआर तिकीट प्रणाली सुरू करण्यात आली आहे. या पेपर क्यूआर तिकिटामुळे सध्याच्या टोकन तिकीट पद्धतीच्या तुलनेत दुप्पट वेगाने तिकिटे देणे शक्य होणार असल्याने मेट्रो प्रवाशांच्या मौल्यवान वेळेची बचत होणार आहे. त्यामुळे ३१ जानेवारीपर्यंत प्लास्टीकच्या टोकनचा वापर बंद होऊन पूर्णपणे पेपर क्यूआर तिकीट पद्धती सुरू होईल, असे एमएमओपीएलतर्फे सांगण्यात आले आहे.





घाटकोपर ते वर्सोवा ही मेट्रो-१ मार्गिका अंधेरी येथे पश्चिम आणि घाटकोपर तेथे मध्य रेल्वे मार्गिकांना जोडत असल्याने या मेट्रो-१ मार्गिकेवरून दररोज लाखो प्रवासी प्रवास करतात. मुंबई मेट्रो वन ही मुंबईतील पेपर क्यूआर तिकीट आणणारी पहिली वाहतूक यंत्रणा ठरली आहे. सध्या पेटीएम आणि रिडलर ॲप्सच्या माध्यमातून उपलब्ध असलेल्या मोबाइल क्यूआर तिकीटचा हा विस्तार आहे. आता मेट्रोचे प्रवासी मुंबई मेट्रो वनच्या सर्व तिकीट काउंटरवर क्यूआर तिकिटे खरेदी करू शकतात. पेपर क्यूआर तिकीट उत्पादनाची रचना रिलायन्स मेट्रो वनच्या अंतर्गत तांत्रिक टीमने गेल्या सहा महिन्यांमध्ये विविध चाचण्या करून केली आहे.

पेपर क्यूआर तिकीट या नवीन तंत्रज्ञानामुळे मुंबई मेट्रो वनच्या तिकीट कर्मचाऱ्यांना सध्याच्या टोकन तिकीट पद्धतीच्या तुलनेत दुप्पट वेगाने तिकिटे देणे शक्य होईल. त्यामुळे मेट्रो प्रवाशांच्या मौल्यवान वेळेची बचत होणार आहे. पेपर क्यूआर तिकिटे जारी केलेल्या यंत्रणा संक्षिप्त, सुयोग्य आणि अत्यंत वेगवान आहेत. त्यामुळे त्या मागणीनुसार विविध ठिकाणांसाठी वापरल्या जाऊ शकतात. पेपर क्यूआर तिकिटावर एखाद्या स्थानकापासून ज्या स्थानकापर्यंत प्रवास करायचा असेल त्याबाबतचा तपशील, भाडे, जारी केल्याची तारीख आणि वेळ छापण्यात येणार आहे.

# सीएएविरोधात २४ जानेवारीला महाराष्ट्र बंद; प्रकाश आंबेडकरांनी केलं आवाहन

**मुंबई-** नागरिकत्व सुधारणा कायदा, राष्ट्रीय नागरिक नोंदणी आणिं ढासळत्या अर्थव्यवस्थेविरोधात वंचित बहुजन आघाडीने २४ जानेवारी रोजी महाराष्ट्र बंद पुकारला आहे. सरकार मनमानी पद्धतीने आपला कार्यक्रम रेटत असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी गुरुवारी केला.

दादर येथील आंबेडकर भवनात आज विविध संघटनांचे पदाधिकारी आणि वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीत बंद पुकारण्याचा निर्णय घेण्यात आला. सीएए आणि एनआरसीविरोधात महाराष्ट्रात ज्या ज्या संघटनांनी आंदोलन केले त्या सर्वांना आजच्या बैठकीत बोलावण्यात आले होते. ३० हून अधिक संघटनांचे पदाधिकारी या बैठकीला उपस्थित होते. या बंदला लोकांनी उत्स्फूर्तपणे पाठिंबा द्यावा, असे आवाहन प्रकाश आंबेडकर यांनी या वेळी केले. देशात एनआरसी आणि सीएएविरोधात रोष आहे. सरकार दडपशाही करून हा कायदा लागू करू पाहत आहे. अर्थव्यवस्था तळाला गेली आहे. २७ लाख कोटी इतका महसूल गोळा होणे अपेक्षित होते.

पृष्ठ १ वरुन

# अंधेरी साईवाडी येथे सिनीअर सिटीझन सोशल राईट्सच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले

कोपऱ्यात बिल्डींगी बांधून दिल्या आहेत. इतक्या मोठया वस्तीमध्ये जेष्ठ नागरीकांना एक विरंगुळा केंद्र ही बनवले नाही. यासाठी सिनिअर सिटीझन सोशल राईट्सच्या वतीने वारंवार मागणी केली असता कोणताही परिणाम झाला नाही. या आंदोलनासाठी संस्थापक दिपक मोरेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाने राष्ट्रीय उपसचिव संतोष चौधर , निवृत्त पोलीस अधिकारी पंढरीनाथ खंडागळे , संस्थेचे सल्लागार व पत्रकार अनंत दाभोळकर , किसन शेवाळे , दिलीप प्रभु ,वासुदेव पाष्टे , उदय देशमुख , हरिश्चंद्र रेवाळे , काशिराम मांडवकर, महादेव पारदळे, राजाराम चव्हाण, शशिकांत बंड तसेच जेष्ठ नागरिक मोठया प्रमाणावर हजर होते.

## संपादकीय...

# नागरिकत्व सुधारणा कायदा नव्या वळण



संपादकः- दिपक मोरेश्वर नाईक

नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या घटनात्मक वैधतेला केरळ सरकारने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिल्यामुळे देशभर वाद, वावटळी आणि वादळे निर्माण करणारा हा प्रश्न नव्या वळणावर येऊन ठेपला आहे. या सुधारित कायद्याच्या विरोधात विधानसभेत ठराव मंजूर करून निषेधाची तुतारी फुंकणारे केरळ हे पहिले राज्य ठरले होते. त्या ठरावानंतर इतरही राज्यांचे मनोधैर्य वाढले आणि अनेक राज्यांतील सत्ताधारी या कायद्याच्या विरोधात आवाज उमटू लागले. आताही या कायद्याला न्यायालयीन आव्हान देणारे केरळ हे पहिले राज्य ठरते आहे.



सर्वोच्च न्यायालयासमोर या कायद्याला आव्हान देणाऱ्या अनेक याचिका आल्या असल्या तरी भारतीय संघराज्यातील एका राज्यानेच त्याला आव्हान दिल्याने या प्रकरणाचे गांभीर्य तर वाढलेच, पण एक नवा घटनात्मक पेच निर्माण होऊ शकतो. भारतीय राज्यघटनेनुसार 'देशाचे नागरिकत्व' हा विषय केंद्रीय सूचीत येतो. शिक्षणाप्रमाणे केंद्र व राज्ये यांच्या संयुक्त म्हणजे समावर्ती सूचीत येत नाही. त्यामुळे, नागरिकत्वाचे कायदे करणे व बदलणे किंवा नागरिकत्वाची व्याख्या व निकष ठरविणे, या साऱ्या गोष्टी संसदेच्या अखत्यारीत येतात. अर्थात, केरळच्या याचिकेत केंद्राच्या या अधिकाराला थेट आव्हान दिले नसून ते नव्या कायद्याच्या घटनात्मक वैधतेला दिले आहे. देशातील प्रत्येक व्यक्तीला कायद्यापुढे समान वागणूक व समान संरक्षण मिळेल, असे घटनेचे चौदावे कलम सांगते, तर पंचविसाव्या कलमानुसार प्रत्येक भारतीय रहिवाशाला धर्माचरणाचे स्वातंत्र्य दिले आहे. या दोन्ही कलमांचा भंग होत असल्याचा दावा केरळच्या याचिकेत आहे. कोणत्याही नव्या कायद्याने भारतीय राज्यघटनेच्या मूलभूत प्राणतत्त्वांना मुळीच धक्का लागता कामा नये, हे सर्वोच्च न्यायालयाने अनेक निकालांमधून पूर्वीच अधोरेखित केले आहे. सत्तेवर कोणीही असले व संसदेला काहीही वाटले तरी राज्यघटनेची मूलभूत चौकट बदलता येणार नाही, असे बजावणारे ते निकाल आहेत. या पार्श्वभूमीवर, सर्वोच्च न्यायालयाने केरळ आणि इतरही याचिका एकत्रित करण्याचे ठरविले आहे. ही न्यायालयीन प्रक्रिया लवकर मार्गी लागावी. तसे झाले तर या प्रश्नाचे जे कमालीचे राजकियीकरण झाले आहे, त्याला थोडा आळा बसेल. देशभरातील नागरिकांनी सर्वोच्च न्यायालयाने दिलेले अनेक महत्त्वपूर्ण व ऐतिहासिक निकाल शांतपणे मान्य करून अलीकडेच राष्ट्रीय वृत्तिगांभीर्य दाखवले आहे. केरळच्या याचिकेकडे या दृष्टीने पाहिले तर केंद्र आणि राज्य सरकारे यांचे संबंध, नागरिकत्वाचा कायदा व त्याची व्याप्ती, नव्या कायद्यातील (केवळ) मुस्लिमेतर अल्पसंख्यांकांचा समावेश, घुसखोर आणि शरणार्थी यांच्या व्याख्या व त्यांच्यातील फरक या साऱ्या मुद्द्यांचा सोक्षमोक्ष एकदाचा घटनापीठासमोर लागून जाईल. तसा तो लागला की, एकतर सरकारला चार पावले मागे यावे लागेल किंवा आंदोलकांना आपापल्या तलवारी म्यान कराव्या लागतील. भारतीय नागरिकत्वाचा प्रश्न हा सोपा किंवा नवा नाही. पंडित मोतिलाल नेहरू यांच्या समितीने १९२८ मध्ये तयार केलेला (स्वतंत्र भारतासंबंधीचा) अहवाल आणि त्याला महंमद अली जिना यांनी त्वरित केलेल्या विरोध इथवर तरी निदान हा इतिहास जातो. घटनापीठ या साऱ्याचा परामर्श घेईलच. १९३५ मध्ये प्रांतिक सरकारे आली आणि त्यानंतर काही दिवसांतच भारताच्या फाळणीचे वादळ घोंघावू लागले. केरळच्या याचिकेत, मलेशिया व फिजी या देशांतील मूळ भारतीयांच्या हक्कांचा विचार का केला नाही, असा एक सवाल आहे. घटनापीठ त्याचा योग्य तो विचार करीलच. मात्र, भारत, बांगलादेश, पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांची भौगोलिक सलगता, तेथील लोकसमूहांचे गेल्या सात दशकांत अनेक कारणांनी झालेले स्थलांतर, यातले तीन देश अस्तित्वात आल्यानंतर त्या देशातील अल्पसंख्याकांची स्थिती यांची तुलना मलेशिया व फिजीमधील मूळ भारतीयांच्या वास्तव्याशी होऊ शकत नाही. कोणत्याही देशाला स्वातंत्र्यानंतर सात दशके आपले नेमके नागरिक कोण आणि का आहेत, हे ठरविता येऊ नये, ही अत्यंत चिंताजनक आणि असंख्य संघर्षांना जन्म देणारी अवस्था आहे. १९५५ मध्ये भारतात नागरिकत्व कायदा आल्यानंतर आजवर तो सहावेळा परिष्कृत झाला आहे. इतक्या महत्त्वाच्या विषयावर राष्ट्रीय परिचर्चा घडवून आणायची असते आणि सौम्यपणे एकेक मुद्दा उकलायचा असतो, याचे भान केंद्र सरकारने ठेवले नाही. त्यामुळेही, देशभरात हिंसाचाराचे पेव फुटले. आता सर्वोच्च न्यायालयाने कालमर्यादा आखून घ्यावी आणि या मुद्द्यांचा काय तो अंतिम निकाल सांगावा. त्या अर्थाने, केरळ सरकारच्या या याचिकेचे स्वागतच करायला हवे!

# 'बाल'कांड!




***भविष्यात मिरवता येईल असे काही वर्तमानात हाती लागत नसेल तर माणसे इतिहासात आधार शोधू लागतात. छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्यावरून आपल्याकडे सध्या जो काही धुरळा उडताना दिसतो तो या सत्याचे प्रतीक मानता येईल. भाजपच्या कोणा जय भगवान गोयल नामक लांगूलचालकाने आपले मायबाप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची तुलना छत्रपती शिवाजी महाराजांशी केली आणि त्याआधी कोणा बालबुद्धी काँग्रेसींनी सावरकर यांच्यासंदर्भात काही अनुदार तपशील दिला. यापैकी स्वतःस अधिकृतपणे भाजपनेता म्हणविणाऱ्या गोयलाने पुस्तक लिहिले तर काँग्रेसने पुस्तिका. त्या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा भाजपच्या मुख्यालयात घडवून आणणाऱ्या गोयलास पंतप्रधान मोदी यांच्यात छत्रपती दिसले तर काँग्रेसींना सावरकर यांना वीर का म्हणावे असा प्रश्न पडला. याबद्दल या दोन्ही पक्षांना मात्रेचे काही वळसे चाटवावे लागतील.***

प्रथम भाजप. या कोणा गोयल यांना खरे तर भाजपने नारळ द्यायला हवा. मोदी यांची तुलना छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी करतात म्हणजे काय? हा मोदी यांचा घोर अपमान तर ठरतोच पण तो करून हे गोयल आपल्या अज्ञानाचेही प्रदर्शन करवतात. अशा इतक्या अज्ञानी माणसास भाजपनेता म्हणविण्याची मुभा कशी काय असू शकते? हा प्रश्न पडण्याचे कारण म्हणजे देशाचे उपराष्ट्रपती, आपल्या एकवाक्यी पांडित्यासाठी ओळखले जाणारे वेंकय्या नायडू यांनी सर्वाच्या आधी मोदी हे ईश्वरी अवतार असल्याचे जाहीर केले असताना परत त्यांची तुलना अन्य कोणाशी करण्याचे पातक हे गोयल कसे काय करू शकतात? शिवाजी महाराज हे लोकोत्तर आणि मानवी कर्तृत्वाचा एक उदात्त आविष्कार. त्याचा विचार या गोयलांनी केला असण्याची शक्यता नाही. पण निदान तो भाजपच्या धुरीणांनी तरी करायला हवा होता. नायडू यांच्यानंतर मध्य प्रदेशचे पराभूत मुख्यमंत्री शिवराज चौहान यांनीदेखील मोदी यांच्या परमेश्वरी अवताराची द्वाही फिरवली होती. आता नायडू यांना मोदी यांच्यातील ईश्वरी अवताराचा प्रत्यय उपराष्ट्रपतिपद मिळण्याआधी आला की नंतर हा प्रश्न फजूल. या त्यांच्या कौतुकाचे वर्णन 'ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी' असे करणे म्हणजे तर नतद्रष्टपणाच ठरेल. तेव्हा तसे करण्याचे पातक न करता हा साक्षात्कार कधी झाला याकडे दुर्लक्ष केले जावे. तो झाला हे महत्त्वाचे. तेव्हा गोयल यांनी त्याचा तरी विचार करायला हवा होता.

खरे तर आपल्या देशाच्या पंतप्रधानाची तुलना अन्य कोणाशी करावी असे वाटणे हेच अक्षम्य पाप. तसे झाल्याने त्यातून भाजपचा गोंधळ दिसतो काय? तसेही असू शकेल. याचे कारण एकदा 'या सम हा' असे मोदी यांचे वर्णन केले गेल्यानंतर हा नेता अन्य कोणासारखा असूच शकत नाही. एकमेवाद्वितीय असलेली व्यक्ती अन्य कोणासारखी असणे जीवशास्त्रीयदृष्ट्यादेखील शक्य नाही. तेव्हा त्या अर्थानेही या गोयल यांची कृती मोदी यांचा अपमान करणारीच ठरते. त्यांच्या या गुन्ह्यांस शासन व्हायला हवे. महात्मा गांधी यांच्या मारेकऱ्याची आरती ओवाळणाऱ्या आणि हुतात्मा हेमंत करकरे यांच्याबद्दल अनुदार उद्गार काढणाऱ्या साध्वी प्रज्ञा यांना आपण कधीही माफ करू शकणार नाही, असे खुद्द मोदी वदले होते. तशीच तंबी या गोयल यांनाही देण्याची गरज आहे. आणि दुसरे असे की यानंतर आपल्या पंतप्रधानाची तुलना नक्की कोणाकोणाशी करावी याचाही विचार भाजपने करायला हवा. वाटल्यास त्यासाठी एखादे चिंतन शिबीर बोलवावे किंवा काही नेत्यांची समिती नेमावी. याचे कारण याआधी या पक्षातील काहींनी मोदी यांची तुलना भारताचे पहिले पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्याशीही केल्याचे स्मरते. वास्तविक मधल्या कालखंडात ही उपाधी लालकृष्ण अडवाणी यांनादेखील दिली गेली होती. पण सत्ताकारणातून मार्गदर्शक मंडलात रवानगी झाल्यानंतर त्यांनी ही उपाधीही गमावली असावी. तेव्हा ईश्वरी अवतार की छत्रपती की पोलादी पुरुष याचा सोक्षमोक्ष एकदा काय तो भाजपने करावा. याबाबतचा गृहपाठ काँग्रेस नेत्यांनीही करण्याची गरज आहे. तसा तो करून झाल्यावर 'वीर' म्हणवून घेण्यास पात्र कोण याचा तपशील त्यांनी जाहीर करावा. त्यामुळे त्यास पात्र होण्यासाठी गांधी/नेहरू घराण्याबाहेरच्या कोणास संधी आहे, ते तरी एकदाचे कळेल. अलीकडे काँग्रेस सेवा दलाने काढलेल्या पुस्तिकेत सावरकरांविषयी काही अनावश्यक भाष्य केल्याने वाद निर्माण झाला. त्याचा परामर्श घेण्याआधी यानिमित्ताने काँग्रेसची 'सेवा दल' नावाची संघटना हयात आहे, हे तरी जनतेस कळले. सत्तेच्या उबेत राहावयाची सवय जडल्याने समस्त काँग्रेस पक्षाचे रूपांतर 'मेवा दला'त कसे झाले यास देश साक्षी आहे. त्यामुळे आजच्या पिढीच्या अनेकांना 'काँग्रेस सेवा दल' हे 'काय प्रकरण आहे बुवा' असा प्रश्न पडला असल्यास त्यांना दोष देता येणार नाही. तर अशा या सेवा दलास सावरकर आणि गांधीहत्येस जबाबदार असणारा नथुराम गोडसे यांच्यातील संबंधांविषयी प्रश्न पडला. तो नुसताच पडला नाही तर तो या सेवा दलाने पुस्तिकेतही नमूद केला.

प्रश्न असा की ही नसती उठाठेव करण्याचे या सेवा दलास कारणच काय? यात कोणती आली आहे सेवा? प्रश्न सावरकरांच्या राजकीय भूमिकेचा असता आणि त्याबाबत या सेवा दलास काही प्रश्न पडला असता तर ते एक वेळ समजण्यासारखे होते. पण विषय राजकारणाचा नाही, सावरकरांच्या सामाजिक सुधारणावादी भूमिकेचा नाही, त्यांच्या काव्यकलेचा तर नाहीच नाही. मग नको त्या 'विषया'ची उठाठेव करायला या सेवा दलास सांगितले कोणी? हा विषय उपस्थित झाल्याने कोणाची कसली सेवा झाली, हे तरी त्यांनी एकदा सांगावे. राहता राहिला मुद्दा सावरकरांना 'वीर' म्हणावे किंवा काय, हा. त्याचे उत्तर इंदिरा गांधी यांनीच इतिहासात देऊन ठेवले आहे. सावरकरांशी संबंधित संस्थेस लिहिलेल्या पत्रात खुद्द इंदिरा गांधी यांनी त्यांनी ब्रिटिशांविरोधात दिलेल्या लढ्याचा गौरवपूर्ण उल्लेख केलेला याची तरी किमान माहिती या कथित सेवा दलाच्या अतिउत्साही पुस्तिकाकर्त्यांना असायला हवी.

याचा अर्थ इतकाच की हे अतिउत्साही आणि तितकेच अक्कलशून्य काँग्रेस कार्यकत्रे काय किंवा काही भाजपवासीय काय! या दोहोंचा पिंड आणि राजकीय यत्ता एकच. मिळेल त्या मार्गाने आपल्या धन्याचे लक्ष वेधून घेणे इतकाच यांचा विचार आणि तितकीच यांची कुवत. हे असे अतिउत्साही आपल्या नेत्यांस कसे संकटात आणतात याचा मोठा इतिहास आपल्या आसपास आहे. तो सत्ताधीशांनी अभ्यासावा. कोणत्याही सत्ताधीशांस खरे आव्हान विरोधकांपेक्षा अशा अविचारी अज्ञ स्वकीयांचे असते. हे असे स्वकीय विरोधकांहाती कोलीत देतात. भाजप आणि काँग्रेस यांच्याबाबत नेमके आता हेच घडले आहे. काहीही कारण नसताना या दोघांनी आपल्याच नेत्यांस आणि पक्षांस संकटात आणले. या बालिश बहु बडबडणाऱ्यांची कमतरता अजिबात नसल्यामुळे राजकारणातील हे 'बाल'कांड संपुष्टात येण्याची चिन्हे नाहीत. काँग्रेसला इतिहासात ते जमले नाही. पण शिस्तीत वाढलेल्या भाजपलाही ते वर्तमानात जमत नसेल तर ते देशाचे दुर्दैव म्हणावे लागेल.

# बुलेट ट्रेनविरोधात पुन्हा उद्रेक; सर्वेक्षणासाठी आलेल्या अधिकाऱ्यांना पिटाळले

***पालघर : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनविरोधातील स्थानिकांचा उद्रेक अद्यापही शमला नसून नंडोरे ते कल्लाळे येथे पोलीस बंदोबस्तात सर्वेक्षणाचे काम करण्यासाठी आलेल्या अधिकाऱ्यांना सर्वेक्षण करू न देताच स्थानिक आणि आदिवासी एकता परिषदेच्या कार्यकर्त्यांनी पिटाळून लावले. दरम्यान, जमीन सर्वेक्षणासाठी आलेल्या अधिकाऱ्यांना पाचव्यांदा रिकाम्या हाताने माघारी जाण्याची नामुष्की ओढवल्याचे सांगण्यात आले.***




विकासाच्या नावाखाली आदिवासींच्या नैसर्गिक संसाधनांचा वापर जबरदस्तीने केला जात असल्याने आदिवासी बेदखल होत आहे. त्यामुळे सरकारने आदिवासी समाजाला सुरक्षितता प्रदान करावी, त्यांना घटनेच्या पाचव्या अनुसूचीने, त्यांच्या ग्रामसभांना अधिकार देऊन आदिवासीने संरक्षण दिले आहे. मात्र त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी होत नसल्याने जिथे जिथे आदिवासी समाज राहतो, तिथे त्यांच्यावर सरकार आणि उद्योगपतीकडून अन्याय केला जात असल्याची खंत छत्तीसगडच्या राज्यपाल अनसूया उईके यांनी नुकत्याच पालघर येथे झालेल्या आदिवासी एकता महासंमेलनात व्यक्त केली होती. राज्यपाल हे आदिवासी समाजाचे संरक्षक असून संविधानाने त्यांना दिलेल्या अधिकारान्वये त्यांना न्याय देण्याचे काम राज्यपालांचे असल्याचे मतही राज्यपाल उईके यांनी व्यक्त केले होते.

जिल्ह्यातील वसईपासून ते बोईसरदरम्यानच्या पूर्व पट्टीतील जमीन बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी अधिग्रहण करण्याचे काम सुरू करण्यात आले होते. जिल्ह्यातील १८७ हेक्टर जमीन संपादनापैकी अवघ्या १० हेक्टर जमिनीचे सर्वेक्षण आतापर्यंत करण्यात आले आहे. तर ७१ गावांपैकी ६ गावांचे सर्वेक्षण करणे आजही बाकी असल्याचे उपजिल्हाधिकारी संदीप पवार यांनी सांगितले. जमीन संपादन करताना कुणावरही जबरदस्ती केली जाणार नसून शासकीय दराप्रमाणे मूल्य देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र या भागातील बहुतांशी शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी या प्रकल्पाला देण्यास एकजुटीने विरोध दर्शवला आहे. आपल्या ग्रामपंचायतीमध्ये झालेल्या ग्रामसभांमध्ये बुलेट ट्रेन प्रकल्पाविरोधात ठराव घेऊन हे ठराव जिल्हाधिकारी, मुख्यमंत्री, राज्यपाल यांना देऊनही आजही आदिवासी व इतर समाजाच्या जमिनी जबरदस्तीने संपादन करण्याचा प्रयत्न केला जात असल्याच्या तक्रारी एकता परिषदेने दिलेल्या आहेत.

### प्रकल्प नकोच

नंडोरे-पडघा-कल्लाळे या भागात बुलेट ट्रेनच्या सर्वेक्षणासाठी काही अधिकारी फौजफाट्यासह आले होते. या वेळी एकता परिषदेचे अध्यक्ष काळूराम धोदडे, शशी सोनवणे, नीता काटकर, भास्कर दळवी, मोरेश्वर दौडा, संतोष मानकर आदी कार्यकर्त्यांशी अधिकाऱ्यांनी चर्चा केली. बुलेट ट्रेनला आमचा विरोध असून आमच्या जमिनी कुठल्याही परिस्थितीत बुलेट ट्रेन प्रकल्पाला देणार नसल्याचे स्पष्टपणे ठणकावून सांगितले.

# पालघर पोलीस दलात खांदेपालट अधिकाऱ्यांच्या बदल्या

**वसई : पालघर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांतील पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षक आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक पदावरील अधिकाऱ्यांच्या पोलीस अधीक्षक गौरव सिंग यांनी नुकत्याच बदल्या केल्या आहेत.**



वसई पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक भास्कर पुकळे यांची अनैतिक मानवी वाहतूक कक्षात नेमणूक करण्यात आली असून त्यांच्या जागी आता वालीव पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक अनंत पराड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तुळींज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक म्हणून जवाहर पोलीस ठाण्यातील गंगाराम वळवी यांची नियुक्ती करण्यात आली आहे, तर याच पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक आनंद मुदलियार यांची नियुक्ती आर्थिक गुन्हे शाखेत करण्यात आली आहे.

आर्थिक गुन्हे शाखेचे महेश विद्याधर शेट्टी यांच्याकडे आता अर्नाळा पोलीस ठाण्याच्या निरीक्षक पदाचा भार देण्यात आला आहे. त्यामुळे अर्नाळा पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक आप्पासाहेब लेंगरे यांची आता नियुक्ती जव्हार पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. वसई पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर टिळेकर यांची देखील नियुक्ती तुळींज पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पालघर येथील पोलीस नियंत्रण कक्षातील सहाय्यक पोलीस निरीक्षक आसिफ बेग यांच्याकडे वालीव पोलीस ठाण्याचा भार देण्यात आला आहे. किंबहुना अर्नाळा पोलीस ठाण्यातील उपनिरीक्षक अरुण भिसे यांची रवानगी आता बोईसर पोलीस ठाण्यात तर तुळींज पोलीस ठाण्यातील उपनिरीक्षक मल्हार थोरात यांना थेट कासा पोलीस ठाण्यात पाठवण्यात आले आहे.

दुसरीकडे मागील आठवड्यातच सफाळे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप सानप यांचे अकाली निधन झाले होते. त्यांच्या जागी स्थानिक गुन्हे शाखेतील सुनील जाधव यांची नियुक्ती करण्यात आली असून तारापूर पोलीस ठाण्याचे सर्जेराव कुंभार यांची पोलीस अधीक्षक कार्यालयात बदली करण्यात आली आहे.

### अधिकारी वर्गात माजली खळबळ

**वसई-विरार, सफाळा आदी भागात पालघर पोलीस अधीक्षक गौरव सिंग यांनी मोठा खांदेपालट केल्याने अधिकारी वर्गात खळबळ माजली आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील तरतुदीनुसार जिल्हास्तरीय पोलीस अस्थापना मंडळाच्या मान्यतेनुसार या बदल्या करण्यात आल्याचे पालघर पोलीस अधीक्षक गौरव सिंग यांनी स्पष्ट केले आहे. अनेक अधिकाऱ्यांना गैरसोयीच्या ठिकाणी जावे लागल्यामुळे त्यांच्यात नाराजी असल्याचे समजते.**

# रस्ता बंदमुळे मीरा-भाईदरकर वेठीस; वाहतूककोंडीत भर

**भाईदर :** शहराच्या मुख्य मार्गावर मेट्रोच्या कामामुळे मोठी वाहतूककोंडी होत असतानाच हाटकेश येथील महत्त्वाचा पर्यायी मार्गही महिनाभरापासून जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी बंद आहे. यामुळे पर्यायी मार्गावरही कोंडी होत असून कामामुळे रहिवासी संतापले आहेत. पाणीपुरवठा विभाग व कंत्राटदाराच्या हलगर्जीपणामुळे नागरिक वेठीस धरले गेले आहेत. या कामासाठी अजून एक महिना जाणार असल्याची माहिती समोर आली आहे.



मेट्रो-९ साठी छत्रपती शिवाजी महाराज या मुख्य रस्त्यावर खोदकाम सुरू झाले आहे. आधीच या रस्त्यावर कोंडी होत असताना मेट्रोच्या कामामुळे कोंडीत अधिकच भर पडली आहे. त्यामुळे भाईंदरमधील नागरिकांनी काही प्रमाणात अंतर्गत रस्त्यांचा वापर सुरू केला आहे. यात न्यू गोल्डन नेस्टपासून थेट हाटकेश चौक व पुढे महामार्गावर वेस्टर्न हॉटेलजवळ निघणाऱ्या मार्गाचा वापर वाढला आहे. शिवाय, घोडबंदर-अदानी पॉवर स्टेशनकडून हाटकेशला येणाऱ्या रस्त्याचा वापरही आधीपासूनच केला जात आहे. परंतु, हाटकेशच्या या मुख्य

मार्गावरील रस्त्याची एक बाजू जलवाहिनी टाकण्याच्या कामामुळे गेल्या महिनाभरापासून बंद आहे. या भागात जलवाहिनी वरून असल्याने ती भूमिगत टाकण्याचे काम पाणीपुरवठा विभागाकडून सुरू आहे. हा रस्ता एका बाजूने बंद केल्याने परिसरातील

रहिवाशांना आपली वाहने काढणे तसेच ये-जा करणे जिकिरीचे बनले आहे. खोदकामामुळे धुळीचे साम्राज्य पसरले असून घरांमध्ये धुळीचा थर साचत आहे. यामुळे काही जणांना श्वसनाचा त्रास होऊ लागला आहे.

# मोर्चा काढण्याच्या नावाखाली महिलांची फसवणूक

## *तीन महिलांची ४२ लाख ४० हजार रूपयांची फसवणूक*

**ठाणे :** दिल्ली येथे वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) विरोधात थाळीनाद मोर्चामध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक महिलेला १५ लाख रूपये देतो असे सांगून महिलांकडूनच विविध प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पैसे उकळणाऱ्या एका टोळीविरोधात ठाणे आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेत गुन्हा दाखल करण्यात आला. मुकरम अली मोहब्बत अली अन्सारी आणि त्याचे साथिदार हेमंत मनिषा, तिरूपती यांच्याविरोधात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांनी कळव्यातील तीन महिलांची तब्बल ४२ लाख ४० हजार रूपयांची फसवणूक केल्याची माहिती पोलिसांनी दिली. याप्रकरणी पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.



फसवणूक झालेल्या महिला कळवा येथे राहतात. २०१७ मध्ये त्यांची मुकरम आणि त्याच्या इतर साथीदारांसोबत ओळख झाली होती. दिल्ली येथे जीएसटी विरोधात थाळीनाद मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चामध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक महिलेला १५ लाख रूपये देण्यात येणार असून यातील २०० महिलांचे नेतृत्त्व करणाऱ्या महिलांना प्रत्येकी अतिरिक्त पाच लाख रूपये मिळणार असल्याचे त्यांनी महिलांना सांगितले. या महिलांनी त्यांच्या परिसरातील शेकडो महिलांना या मोर्चात सहभागी करण्याचे ठरवले. त्यानंतर मुकरम आणि त्याच्या साथिदारांनी मोर्चात सहभागी होणाऱ्या महिलांचे अर्ज भरले. या अर्जाच्या बदल्यात मुकरमने प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी तिन्ही महिलांकडून ६० हजार रूपये घेतले. त्यानंतर विविध प्रक्रिया पार पाडण्यासाठी टप्प्या-टप्प्याने तब्बल ४२ लाख ४० हजार रूपये उकळले. मात्र, तीन वर्षे उलटली असतानाही कोणताही मोर्चा काढण्यात आला नसल्याने आपली फसवणूक झाल्याचे महिलांच्या लक्षात आले.

# मीरा भाईदर पालिका कर्मचाऱ्यावर जीवघेणा हल्ला

**मीरा रोड** - मीरा भाईंदर महापालिकेचे कर्मचारी केलपी घडशी रा. उत्तन यांना अनोळखी मारेकऱ्याने धारदार शस्त्राने डोके व पाठीवर वार करुन जखमी केल्याची घटना काशिमीरा भागात घडली आहे.



केलपी घडशी व रवी सानप हे दोघे निलकमल नाका जवळील स्वागत ऑर्केस्ट्रा बारमध्ये बुधवारी रात्री बसले होते. त्यावेळी घडशी हे परिचीत आरिफ सिद्दीकी भेटल्याने त्याच्या सोबत बारच्या बाहेर बोलत थांबले. तोच एका गाडीतुन आलेल्या चार - पाच जणांपैकी एकाने जवळ येऊन मारहाण सुरु केली. त्यासरशी सिदद्दीकी पळुन गेला. पण घडशीच्या पाठ व डोक्यावर मात्र धारदार शस्त्रांनी वार करण्यात आले. जखमी घडशीला भिमसेन जोशी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# फेरीवाले हटवण्यासाठी विना निवीदा ठेका दिलेल्या ठेकेदाराचे काम अखेर थांबवले

**मीरा रोड - निवीदा न मागवताच दरमहा सुमारे २० लाख रुपयांचा ठेका मीरा भाईदर मधील प्रमुख १३ रस्त्यांवरील फेरीवाले हटवण्यासाठी दिल्याचे प्रकरण चव्हाट्यावर आले असतानाच सत्ताधारी भाजपा व महापालिके विरोधात झालेल्या गंभीर तक्रारीं मुळे अखेर महापालिकेने ठेकेदाराची मुदतवाढ रद्द केली आहे. तर ठेकेदारास दिलेल्या लाखो रुपयांच्या देयकात घोटाळा असुन सखोल चौकशीची मागणी होत आहे.**

शहरातील फेरीवाल्यांना हटवण्याची जबाबदारी महापालिका प्रशासनाची असुन त्यासाठी



पथक असुनही सत्ताधारी भाजपा व प्रशासनाने मिळुन खाजगी ठेकेदार नेमला. भाईंदर पुर्वेच्या रावल नगर, नर्मदादिप मधील फय्यज खान यांच्या एस.डी. सव्हिसेसने फेरीवाला हटवण्याचे काम मिळावे म्हणुन स्थायी समिती सभापतीं कडे अर्ज केला आणि केवळ अर्जाच्या आधारे आयुक्त बालाजी खतगावकरांनी देखील निवीदा न काढताच ठेका देऊन टाकला. मार्च ते मे २०१९ असे ३ महिन्यासाठी कंत्राट दिले गेले होते. त्यासाठी ५० कर्मचारी, स्कॉर्पियो, दुचाकी, टॅम्पो आदींच्या दरास मंजुरी दिली.

ठेकेदाराने त्याला दिलेल्या १३ रस्त्यां वरील फेरीवाले पुर्णपणे हटवले नसतानाच पालिकेने मार्च व एप्रिलचे ३५ लाख त्याला दिले. तर मे व जुन चे तब्बल ५० लाख देण्याचे प्रयत्न होते. ठेक्याची मुदत ६ जुन रोजी संपलेली असताना त्याला कायम ठेवत तब्बल दिड महिन्यांनी म्हणजेच २३ जुलै रोजी पालिकेने ठेकेदारास आणखी दोन महिन्यांची मुदतवाढ देऊन टाकली. ती मुदत सुध्दा ६ ऑगस्ट रोजी संपलेली असताना नविन ठेकेदार नियुक्त करत नाही तो पर्यंत मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने ऑगस्ट मध्ये दिला होता. पण नंतर मात्र आयुक्त खतगावकरांनी २० सप्टेंबर रोजी पुन्हा मुदतवाढ दिली.

फेरीवाले एकीकडे कायम असताना दुसरीकडे ठेकेदाराच्या कर्मचारी, वाहन, कारवाई आदी नोंदी केवळ हाताने नोंदवहित केल्या जात होत्या. या नोंदीत मोठा घोटाळा असल्याचे आरोप सुध्दा होऊ लागले. खासदार राजन विचारे व आमदार प्रताप सरनाईक यांनी देखील विना निवीदा दिलेल्या ठेक्या प्रकरणी आयुक्तांसह प्रशासनाना जाहिरपणे फैलावर घेतले होते. आमदार गीता जैन, माजी नगरसेवक संजय पांगे आदिंनी या गैरप्रकाराच्या तक्रारी करुन कारवाईची मागणी केली.

# अनेकांना वाटतं होतं मी निवृत्त होईन, पण तसं घडलं नाही - शरद पवार

**बारामती-** विधानसभा निवडणुकीत पवाराचं राजकारण संपलं आहे, असं म्हणणाऱ्या भाजपा नेत्यांचा राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी नामोल्लेख टाळत समाचार घेतला. 'अनेकांना वाटत होतं की, मी निवृत्त होईल. पण तसं घडलं नाही. महाराष्ट्रातील जनतेनं तसं घडू दिलं नाही,' असं म्हणत शरद पवारांनी भाजपाच्या नेत्यांना उत्तर दिलं. बारामतीमध्ये कृषीप्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे. चार दिवस चालणाऱ्या प्रदर्शनाचं राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार, अभिनेता आमिर खान यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शरद पवार यांनी संवाद साधला. यावेळी बोलण्याला सुरूवात करताच पवारांनी भाजपाच्या नेत्या नाव न घेता टोला लगावला. पवार म्हणाले, 'अनेकांना वाटतं होतं की, मी निवृत्त होईल. पण, तसं घडलं नाही. महाराष्ट्रातील जनतेनं घडू दिलं नाही आणि मी काही अशात निवृत्त होणार नाही,' असं पवारांनी सांगताच उपस्थितांमध्ये खसखस पिकली. कृषीप्रदर्शनाविषयी पवार यांनी मनोगत व्यक्त केलं. 'जगाची शेती बदलली आहे. शेतीमध्ये सुधारणा झाल्या पाहिजे. संशोधन करण्याची गरज आहे. कुठे संशोधन होत असेल आणि ते चुकीचं असेल तर नाकारलं तर हरकत नाही. पण उपयुक्त असेल तर ते थांबवण्याची भूमिका चुकीची आहे. ठिबक घराघरामध्ये पोहोचले आहे. पाण्यावर मर्यादा आणण्याच्या सरकारच्या कल्पना रास्त आहेत. पण, शेतीमध्ये पैसा गुंतवण्याची



ताकद शेतकऱ्यांमध्ये नाही. त्यासाठी सहकार यायला हवा,' असं पवार यांनी सांगितलं. कोण म्हणालं होतं पवारांचं राजकारण संपलं? राज्यात विधानसभा निवडणुकीचा प्रचार जोरात असताना माजी मुख्यमंत्री आणि भाजपाचे नेते देवेंद्र फडणवीस एका कार्यक्रमात शरद पवारांविषयी बोलले होते.

# फडणवीस सरकारचे टेंडर रॅकेट उघड : काँग्रेस

**मुंबई -** फडणवीस सरकारच्या काळातील पंतप्रधान घरकुल योजनेतील सिडकोच्या १४ हजार कोटी रुपये आणि आरे कॉलनी येथील मेट्रो भवनच्या टेंडरच्या गैरव्यवहाराबाबत काँग्रेसने केलेली तक्रार कॅगने योग्य ठरवली असून याद्वारे फडणवीस सरकारच्या टेंडर मॅनेजमेंट रॅकेटचा पर्दाफाश झाला आहे, असा दावा करत काँग्रेसचे सरचिटणीस व प्रवक्ते सचिन सावंत यांनी भाजपवर टीका केली आहे.

गांधी भवन येथे पत्रकार परिषदेत सावंत म्हणाले, की फडणवीस सरकारच्या कालावधीमध्ये नियमांना बगल देऊन, नियमांची मोडतोड करून मनमानीप्रमाणे नवीन नियम तयार करून राज्यातील मोठमोठ्या प्रकल्पांच्या निविदा तयार केल्या जात होत्या. मर्जीतल्या कंत्राटदारांनाच काम मिळेल याची सोय केली जाऊन टेंडर मॅनेजमेंट रॅकेट चालवले जात होते. नवी मुंबई येथील घरकुल योजनेच्या १४ हजार कोटींच्या निविदेतील भ्रष्टाचार व मेट्रो भवनच्या कंत्राटाचा या कंत्राटाच्या वाटपाशी अर्थपूर्ण संबंध होता, असे सावंत यांनी स्पष्ट केले. कॅगने घेतलेले आक्षेप या टेंडर प्रक्रियेत भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शक आहेत, असे सावंत म्हणाले.

# गोड बोलणाऱ्यांपेक्षा खरं बोलणाऱ्यांच्या मागे उभे रहा

**बीड -** गोड बोलणारांपेक्षा खरं बोलणाऱ्यांच्या मागे उभे रहा. मला कशाचीही अपेक्षा नाही, फक्त तुमचे आशीर्वाद महत्वाचे आहेत. तर जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी भविष्यातही कायम लढत राहणार असल्याचे माजी मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्यात. संत वामनभाऊ महाराज यांचा ४४ वा पुण्यतिथी सोहळा पार पडला त्यावेळी त्या बोलत होत्या. राजकीय



धामधुमीनंतर शुक्रवारी पहिल्यांदाच सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे आणि भाजप नेत्या पंकजा मुंडे हे भाऊ-बहीण एकाच व्यापीठावर पाहायला मिळाले. संत वामनभाऊ महाराज यांच्या ४४ व्या पुण्यतिथी निमित्त हे दोघेही एकाच व्यासपीठावर आले होते. यावेळी पंकजा मुंडे म्हणाल्या, समाजातील वंचितांचा वाली आणि वाणी बनण्याची शिकवण लोकनेते मुंडे साहेबांनी आम्हाला दिली आहे, त्यामळे कोणतेही पद किंवा सत्ता असो वा नसो वंचितांचे अश्रू पुसण्याचे काम अखेरच्या श्वासापर्यंत करत राहू. आयुष्यात अनेक संघर्ष वाट्याला आले, धीर सोडू नका, सदैव तुमच्यासाठीच मी काम करत राहणार आहे. गोड बोलणारांपेक्षा खरं बोलणाऱ्यांच्या मागे उभे रहा असेही यावेळी पंकजा मुंडे म्हणाल्या. तर संत वामनभाऊ महाराजांची एक भक्त म्हणून या गडावर मी नेहमी येते व पुढेही येतच राहणार आहे, त्यांच्या प्रेरणेमळे पांच वर्षात जिल्ह्याची सेवा मला करता आली, ही सेवा अशीच पुढे करण्यासाठी तुमच्या मनातील माझे स्थान कायम ठेवा अशी भावना पंकजा मुंडे यांनी यावेळी व्यक्त केली.

# मुंबई-पुणे 'हायपर लूप' प्रकल्प 'नको रे बाबा'; उपमुख्यमंत्री अजित पवारांची भूमिका

**पुणे-** सार्वजनिक पायाभूत सुविधा प्रकल्प म्हणून फडणवीस सरकारने मान्यता दिलेल्या, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा (पीएमआरडीए) मुंबई-पुणे 'हायपर लूप' प्रकल्प 'नको रे बाबा', अशी भूमिका उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतली आहे.

'हायपर लूप' जगात कुठे झालेली नाही, त्यामुळे त्याची ट्रायल आपल्याकडे नको. 'हायपर लूप'ची ट्रायल घ्यायची आपली क्षमता नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. प्रथम जगात



तो किमान दहा किलोमीटर तरी अस्तित्वात येऊ द्या. नंतर बघू, असे पवार यांनी सांगितले. मी या प्रकल्पाला नाही म्हटले नाही, पण 'हायपर लूप'ची ट्रायल घ्यायची आपली क्षमता नाही, असे त्यांनी सांगितले.

माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणे ते मुंबई हायपर लूप प्रकल्पासाठी सुमारे पाच हजार कोटी रुपयांचा करार केला होता. हा प्रवास ताशी १,२२० किलोमीटर असेल तशी त्याची रचना होती. हायपरलूप सुरू झाल्यानंतर, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स ते वाकड (पुणे) दरम्यानचे ११७.५ किलोमीटरचे अंतर २३ मिनिटांत पार करता येईल, असे त्यांनी सांगितले होते. ७० हजार कोटींच्या प्रकल्पासाठी दुबईतील कंपनी गुंतवणुकीस तयार झाली होती.पहिला टप्पा पीएमआरडीए प्राधिकरणाच्या गहुंजे ते उस्से गावापर्यंतचा ११.८ किलोमीटरचा होता. तो अडीच वर्षांत पूर्ण करण्याचे नियोजन होते. त्यासाठी ५ हजार कोटींची तरतूद होती. पहिला टप्पा यशस्वीपणे पूर्ण झाल्यास बीकेसी ते वाकडपर्यंतच्या दुसऱ्या टप्प्याचे नियोजन होते. त्यानुसार हा टप्पा ६ ते ८ वर्षांत पूर्ण करण्यात येणार होता.

# 'मेगा'भरती ही भाजपची चूक -चंद्रकांत पाटील

**पिंपरी-चिंचवड-** विधानसभा निवडणुकीच्या काळात भाजपने केलेली मेगाभरती ही चूकच अशी कबुली भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी दिली आहे. भाजपच्या मूळ संस्कृतीला मेगाभरतीचा फटका बसल्याचं देखील चंद्रकांत पाटील यांनी पिंपरी चिंचवडमधील भाजपच्या मेळाव्यात कबुल केलं आहे.



विधानसभा निवडणुकीच्या काळात भाजपने केलेली मेगाभरती ही सगळ्याच राजकीय पक्षांना हादरे बसवणारी होती. काँग्रेस आणि राष्ट्रवादीमधील अनेक दिग्गज नेत्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. याचाच फटका भाजपला बसल्याचं पाटील म्हणाले. मेगाभरतीमुळे भाजपची संस्कृती थोडी बिघडली. भाजपची संस्कृती अशी नव्हती. हा पक्ष प्रेमावर चालतो. पण थोडा बदल झाला. जो काम करतो त्याला नाही तर तो आपल्या जवळ आहे त्याला पदं दिली गेलीत. हे कल्चर आता उद्धवस्त करावं लागणार आहे, असं देखील पाटील यावेळी बोलले. चंद्रकांत पाटील यांनी या मेळाव्यात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना टोला लगावला आहे. शक्तीसंचय करण्यासाठी इतर पक्षातील दिग्गज नेते आपल्या पक्षात घ्यावे लागतात असा दावा माजी मुख्यमंत्र्यांनी केला होता.

# 'ॲमेझॉन' १० लाख भारतीयांना देणार नोकऱ्या

**नवी दिल्ली-** भारतात येत्या पाच वर्षांच्या कालावधीत १ अब्ज अमेरिकी डॉलरची गुंतवणूक करण्यात येणार असल्याच्या घोषणेनंतर ॲमेझॉनने आता रोजगारनिर्मितीबाबत महत्त्वाची घोषणा केली आहे. ॲमेझॉनतर्फे भारतात येत्या ५ वर्षांत १० लाख नवे रोजगार निर्माण केले जातील, असे भारतभेटीवर आलेले ॲमेझॉनचे सीईओ जेफ बेझोस यांनी शुक्रवारी सांगितले. तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा व दळणवळण क्षेत्रात ॲमेझॉनकडून होणाऱ्या गुंतवणुकीच्या माध्यमातून हे रोजगार उपलब्ध होतील, असे ते म्हणाले. गेल्या ६ वर्षांच्या कालावधीत ॲमेझॉनने भारतात ७ लाख रोजगार निर्माण केले आहेत. आमच्या कंपनीच्या येथील व्यवसायात कर्मचाऱ्यांचे योगदान अमूल्य आहे. आमच्याशी जोडल्या गेलेल्या लहान व्यावसायिकांनी असामान्य सृजन दाखवले आहे. तसेच, आमच्या मंचावरून विकल्या जाणाऱ्या उत्पादनांना येथील ग्राहकांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे भविष्यात येथे व्यवसायविस्तार करण्याचे उद्दिष्ट कंपनीने आखले असून त्यातून स्थानिक तरुणांना रोजगार व देशी व्यावसायिकांना बाजार उपलब्ध होईल, असे बेझोस म्हणाले. ॲमेझॉनला येथील व्यवसायात मोठ्या प्रमाणावर



तोटा होत असल्याने ते १ अब्ज अमेरिकी डॉलरची गुंतवणूक करणार आहेत, त्यामुळे ते आपल्या देशावर कोणत्याही प्रकारे उपकार करत नाहीत, अशा शब्दांत केंद्रीय उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी ॲमेझॉनचा समाचार घेतला होता. त्यांच्या या वक्तव्याचे शुक्रवारी तीव्र पडसाद उमटले. काही बहुराष्ट्रीय तसेच, देशी कंपन्यांनी या विधानाबाबत नाराजी व्यक्त केली. यानंतर गोयल यांनी नरमाईची भूमिका घेत विदेशी कंपन्यांच्या गुंतवणुकीचे आम्ही स्वागत करतो, मात्र त्यांनी येथील कायद्याच्या चौकटीत राहून व्यवसाय करणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले.

# उपराजधानीत वर्षभरात विना हेल्मेट ६१२ दुचाकीस्वारांचे बळी

**नागपूर-** विना हेल्मेट प्रवास जीवघेणा ठरतो, असे असताना देखील बहुसंख्य दुचाकीचालक हेल्मेट टाळतात. परिणामी, अपघात झाल्यास मेंदूला जबर मार बसून गंभीर जखमी होतात. २०१९ या वर्षात विविध अपघातामध्ये जखमी झालेल्या ३६८४ चालकांना मेडिकलच्या 'ट्रॉमा केअर सेंटर'मध्ये दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान



यातील ८०० चालकांचा मृत्यू झाला. धक्कादायक म्हणजे, यात विना हेल्मेट चालकांची संख्या ६१२ होती.

रस्ते अपघातातील जखमींना तातडीने वैद्यकीय सेवा मिळावी म्हणून मेडिकलने 'ट्रॉमा केअर सेंटर' सुरू केले. या सेंटरमध्ये गेल्या तीन वर्षांत जखमींची संख्या वाढली आहे. २४ तास तज्ज्ञ डॉक्टरांची चमू येथे कार्यरत असल्याने हे 'सेंटर' अनेकांसाठी वरदान ठरत आहे. परंतु अपघातांच्या वाढत्या संख्येने रुग्णांची संख्याही वाढली आहे. विशेष म्हणजे, हेल्मेटचा सक्तीचा वापर करण्याचा शासनाकडून प्रयत्न होत आहे. वाहतूक पोलीस विभागाकडून विना हेल्मेट चालकांवर मोठ्या प्रमाणात कारवाई करीत आहे. मात्र, हेल्मेटचे महत्त्व माहीत असताना सुद्धा बहुसंख्य दुचाकीचालक त्याच्याकडे ओझे म्हणून पाहतात. यामुळे चौकात पोलीस असतील तरच हेल्मेट घालण्याचे किंवा पळवाटा शोधण्याची वृत्ती वाढत असल्याने रस्ता अपघातात विना हेल्मेट वाहनधारक गंभीर जखमी होत असून मृत्यूच्या दारात पोहचत आहे. गेल्या वर्षभरात विना हेल्मेट दुचाकी चालविणाऱ्या ६१२ चालकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. विशेष म्हणजे, वाहन चालविताना मोबाईलवर बोलणेही २१ चालकांसाठी मृत्यूचे कारण ठरले. जानेवारी ते डिसेंबरपर्यंत ट्रॉमा केअर सेंटरमध्ये येणाऱ्या जखमींची माहिती गोळा करण्यात आली आहे. यात रस्ता अपघातात जखमी झालेल्या ९० टक्के दुचाकीस्वारांनी हेल्मेट घातले नव्हते. यातील ७६ टक्के जखमींना जीवाला मुकावे लागले. ही धक्कादायक वस्तूस्थिती आहे.

# परप्रांतातून येऊन घरफोड्या करणाऱ्या अट्टल गुन्हेगारांच्या भईंदर (पुर्व), नवघर रोड पोलिसांनी दिल्लीतून आवळल्या मुसक्या



नवघर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गोल्डन नेस्ट येथे एका रो हाऊसमध्ये १४ डिसेंबर २०१९ रोजी दिवसाढवळया अज्ञात चोरटयांनी दरवाजा तोडून रोख रक्कम व दागिन्यांसह अंदाजे एकूण १५ लाखांचा मुद्देमाल सराईतपणे लंपास केला. अतिशय जलद गतीने भाईंदर नवघर पोलीसांनी या घरफोडी करणाऱ्या गुन्हेगारांना दिल्ली येथून अटक केली. पोलीस सतत १५ दिवस गुन्हेगारांना पकडण्यासाठी दिल्ली येथे ठाण मांडून राहीले व या घरफोडी करणाऱ्या गुन्हेगारांना पोलीसांनी पकडले. सुरवातीस नकार देणाऱ्या या गुन्हेगारांना पोलीस खाक्या दाखवताच त्यांनी गुन्हयाची कबूली दिली व यातूनच त्यांनी महाराष्ट्र, हरियाणा व अशा अनेक राज्यांत चोरी केल्याची माहिती दिली. सदरची कामगिरी मा. श्री. शिवाजी राठोड, पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, मा. श्री. संजय पाटील, अपर पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, डॉ. शशीकांत भोसले, उप विभा.पो.अधि. भाईंदर विभाग, व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, प्रकाश बिराजदार, पोलीस निरीक्षक(गुन्हे), संपतराव पाटील, नवघर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शना खाली नवघर पोलीस ठाण्याचे सहा. पो. निरी. योगेश काळे, स.पो.उप निरी. बी. व्ही. राठोड, पो.ना. रविंद्र भालेराव, पोना. प्रशांत वाघ, पोशि. गिरगांवकर, पोशि. आकाश वाकडे, पोशि. नवनाथ माने, पोशि. निलेश शिंदे, पोशि. सुनिल ठाकुर व नवघर पोलीस ठाण्याचे विशेष तपास पथक यांनी केलेली असुन सदर गुन्हयांचा तपास सहा.पो.निरी. योगेश काळे हे करीत असुन, तपास चालू आहे.




हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. २, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)